## महाराष्ट्र राज्य वन्यजीव मंडळाची सहावी बैठक दिनांक ७ जून २०१२
## कार्यवृत्तांत

महाराष्ट्र राज्य वन्यजीव मंडळाची ६ वी बैठक गुरूवार, दिनांक ०७/०६/२०१२ रोजी मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालयातील समिती कक्ष मंत्रालय, मुंबई येथे मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, यांचे अध्यक्षतेखाली सकाळी ११.०० वाजता संपन्न झाली. बैठकीतील जे उपस्थित होते त्यांची नांवे सोबतच्या यादीत दिलेली आहेत. सभेच्या सुरुवातीस प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), नागपूर तथा सदस्य सचिव यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन सभेची पार्श्वभूमि व सभेत ठेवण्यांत आलेल्या विषयाबाबत प्रास्तविक केले. त्यानंतर मा. अध्यक्ष यांच्या परवानगीने विषयसूचीनुसार सभेत माहिती दिली. बैठकीत देण्यात आलेली माहिती, झालेली चर्चा व मंडळाने घेतलेले निर्णय खालीलप्रमाणे आहेत.

**विषय क्रमांक १ (अ) : दिनांक २८-६-२०११ रोजी मुंबई येथे झालेल्या ५ व्या बैठकीचे कार्यवृत्त कायम करणे.**

प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) तथा सदस्य सचिव यांनी बैठकीत असे सांगितले की, मागील बैठकीचे कार्यवृत्तांत सर्व मा. सदस्यांना पाठविण्यात आले होते. त्यावर कोणत्याही सदस्यांनी आपले अभिप्राय कळविले नाही. या कार्यवृत्तांतास मंजूरी देण्यास त्यांनी मंडळास विनंती केली. त्याप्रमाणे दिनांक २८ जून २०११ रोजी झालेल्या बैठकीच्या कार्यवृत्तांतास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

**विषय क्रमांक १(ब): महाराष्ट्र राज्य वन्यजीव मंडळाच्या दिनांक २८-६-२०११ रोजी झालेल्या ५ व्या बैठकीत घेतलेल्या निर्णयांवर केलेली कार्यवाही.**

**याबाबतची माहिती मंडळासमोर ठेवण्यांत आली.**

**विषय क्रमांक २ : राष्ट्रीय उद्यान/अभयारण्यात व त्याभेवतालच्या १० कि.मी. च्या परिसरातील इतर विकास कामांना मंजूरी देणे.**

| अक्र | मुद्दा | बैठकीत दिलेली माहिती | झालेली चर्चा व घेतलेले निर्णय |
|---|---|---|---|
| २.१ | **मेळघाट अभयारण्या पासून १० कि.मी. परिघात प्रस्तावित केलेल्या बागलिंगा लघु पाटबंधारे प्रकल्पास (क्षेत्र १४.७५ हे.) मान्यता देणे** | जलसंपदा विभागाकडून प्रस्तावित झालेल्या या बागलिंगा लघु पाटबंधारे प्रकल्पाचे क्षेत्र पूर्व मेळघाट वनविभागात येते. त्याकरीता एकूण १४.७५ हे. क्षेत्राची आवश्यकता असून, त्यापैकी ११.८८ हे. राखीव वनक्षेत्र व २.८७ हे. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देशानूसार वनसंज्ञेत मोडणारे क्षेत्र आहे. या प्रकल्पामुळे ७२१ वृक्षांची तोड होणार आहे. प्रकल्पाचे क्षेत्र कोणत्याही अभयारण्य व राष्ट्रीय उद्यानाचा भाग नाही. परंतू हे क्षेत्र मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या कोअरच्या बाहेर ८.५ कि.मी. अंतरावर तथापि बफर | आदिवासी व लहान मुलांकरिता कुपोषनग्रस्त क्षेत्र असून सिंचनाचा अभाव असल्याने व बारमाही पाणवठा वन्यप्राण्यांसाठी उपलब्ध होईल तसेच स्थानिकांचा शेतीचा दर्जा सुधारण्यास देखील यामुळे मदत होईल. हा प्रकल्प मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या बफर क्षेत्रालगतचा भाग असल्यामुळे त्याठिकाणी मानव व वन्यप्राण्यांचे अस्तित्व राखणे अत्यंत महत्वाचे |

| | | | |
|---|---|---|---|
| | | क्षेत्रात सीमेपासून १.५ कि.मी. आत आहे. प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर त्या क्षेत्रात बारमाही पाणी उपलब्ध होणार आहे आणि आदिवासींच्या १३१२ हेक्टर शेतीला सिंचनाची सोय उपलब्ध होणार आहे. सदर प्रकल्प मेळघाट अभयारण्यापासून १० कि.मी. चे आत असल्याने त्यास राज्य वन्यजीव मंडळ व राष्ट्रीय वन्यजीव मंडळाची मान्यता घेणे आवश्यक आहे. मुख्य वन्यजीव रक्षकांनी या प्रस्तावाची शिफारस केली आहे. केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन विभागाच्या सूचनेप्रमाणे हा प्रस्ताव राज्य वन्यजीव मंडळासमोर मान्यतेसाठी ठेवण्यात येत आहे. त्यानंतर तो राष्ट्रीय वन्यजीव मंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येईल. | आहे. सदरचा प्रकल्प या दोन्ही बाबीस उपयुक्त ठरणार असल्याने विस्तृत चर्चेनंतर सदर प्रस्तावाचे मंजुरीस मंडळाने शिफारस केली. |
| २.२ | **तानसा अभयारण्यात गारगाई नदी प्रकल्पासाठी सर्वेक्षण व तपास कार्य करण्याच्या कामास मान्यता देणे.** | बृहन्मुंबई महानगरपालिकेने पिण्याच्या पाण्यासाठी तानसा अभयारण्यात गारगाई नदीवर कॉक्रीटचे धरण बांधण्याच्या नियोजित प्रकल्पासाठी अभयारण्य क्षेत्रात सर्वेक्षण व तपास कार्य करण्यास मान्यता देण्याचा प्रस्ताव सादर केला आहे. सदर प्रस्ताव केवळ सर्वेक्षण आणि तपास कार्याचा असला तरी हे काम धरण बांधण्याच्या प्रक्रियेचा प्राथमिक भाग आहे. तानसा अभयारण्यावर आधीच मानवी दबाव मोठया प्रमाणात असून प्रस्तावित धरणामुळे सुमारे ७५० हे. अभयारण्य क्षेत्र नष्ट होणार आहे. यामुळे वन्यजीव अधिवासाची आणि जैविक विविधतेची हानी संभवते. या कारणास्तव, सदर प्रकल्पासाठीच्या सर्वेक्षण आणि तपासकामाच्या प्रस्तावाची शिफारस मुख्य वन्यजीव रक्षक यांनी केलेली नाही. तथापि मंडळाच्या विचारार्थ सदर प्रस्ताव ठेवण्यात येत आहे. | सदर प्रकल्प हा मुंबई शहरास पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्याविषयीचा असून, शहर भविष्यात विकास होणारे असल्यामुळे या शहराच्या गरजा अजून वाढणारच आहेत त्यामुळे दिलेल्या चार पर्यायांपैकी प्रस्तावीत पर्याय अधिक पाणी साठयाचा व कमी लांबीचा असून गुरूत्वाकर्षणाने भुयारी मार्गातून पाणी मोडक सागर जलाशयात पाठविता येणार असल्याने अधिक किफायतशीर व उपयुक्त आहे. त्यामुळे प्रथम टप्पात सर्वेक्षण व तपास कार्य करण्यास मंडळाने शिफारस केली. |
| २.३ | **संजय गांधी राष्ट्रिय उद्यान येथे चेना व येवूर येथे सर्वेक्षण व तपासकार्यासाठी बोअर करण्यांच्या कामास मान्यता देणे.** | संजय गांधी राष्ट्रिय उद्यानातील चेना व येवूर येथे मातीची तीन धरणे बांधण्यासाठी सर्वेक्षण व तपासकार्यासाठी बोअर करण्यांच्या कामास मान्यता मिळण्यासाठीचा प्रस्ताव जलसंपदा विभागामार्फत प्राप्त झाला आहे. प्रस्तावित धरणात राष्ट्रीय उद्यानाचे ८० हे. वनक्षेत्र नष्ट होणार आहे. या धरणांमधून ठाणे महानगरासाठी पिण्याच्या पाण्याची सोय होणार आहे. सर्वेक्षणाचे काम १२० हेक्टरवर होणार आहे.<br>संजय गांधी राष्ट्रिय उद्यानातून याआधीच तुळशी आणि विहार या जलाशयांतून मुंबई महानगराला पाणीपुरवठा होत आहे. प्रस्तावित नव्या धरणांमुळे आणखी मौल्यवान वन्यजीव अधिवास नष्ट होणार | प्रधान सचिव (वने) यांनी सभेत निदर्शनास आणून दिले की, ``It is not necessary to construct any new source for water supply up to the year २०३१`` असे बंधपत्र प्रकल्प यंत्रनेकडून शाही प्रकल्पाच्या मंजूरीच्या वेळी, प्राप्त झाल्याने व या क्षेत्रात वर्ष २०३१ पर्यत कोणताही नविन प्रकल्प मंजूर करता येणार नाही अशी अट त्यावेळी शासनाने टाकली होती त्यामुळे पुन्हा नविन प्रकल्पाचे |

| | | | |
|---|---|---|---|
| | | आहे. हे वन्यजीवांच्या हिताचे नाही. प्रकल्प यंत्रणेने अन्य पर्यायाचा विचार करणे आवश्यक आहे. याप्रमाणे विचार करुन मुख्य वन्यजीव रक्षकांनी सदर प्रस्तावास शिफारस नाकारलेली आहे. तथापि मंडळाच्या विचारार्थ सदर प्रस्ताव ठेवण्यात येत आहे. | मंजूरीस मंडळाने शिफारस करण्यास नाकारले आहे. |
| २.४ | **तुंगारेश्वर अभयारण्यात मौ. देवखिंडपाडा-कामन त. वसई जि. ठाणे येथे सर्वेक्षण व तपासकार्यासाठी बोअर करण्याच्या कामास मान्यता देणे** | ठाणे जिल्हयातील तुंगारेश्वर अभयारण्यात कामन नदीवर मौ. देवखिंडपाडा-कामन येथे सर्वेक्षण व तपासकार्यासाठी बोअर करण्याच्या कामास मान्यता मिळण्यासाठीचा प्रस्ताव जलसंपदा विभागामार्फत प्राप्त झाला आहे. हा प्रकल्प वसई-विरार शहराच्या पिण्याच्या पाण्यासाठी आणि शेतीसिंचनासाठी नियोजित आहे. या प्रकल्पांतर्गत अभयारण्याचे किती क्षेत्र बुडीत होणार ते प्रकल्पयंत्रणेने नमूद केलेले नाही. तथापि, अभयारण्यात नदीवर धरणाचे आणि कालव्यांचे बांधकाम झाल्यास मोठया प्रमाणात वन्यजीव अधिवास नष्ट तथा खंडीत होईल. या क्षेत्रातील वनस्पती-प्राणीसृष्टी, निसर्ग परिस्थिती या सर्वांच्या हिताच्या दृष्टिकोनातून सदर प्रस्तावास मुख्य वन्यजीव रक्षक यांनी शिफारस नाकारली आहे. तथापि मंडळाच्या विचारार्थ सदर प्रस्ताव ठेवण्यात येत आहे. | वसई-विरार या क्षेत्रास पिण्याच्या पाण्याची उपलब्धता व्हावी या उद्येशाने लहान जलाशयाची निर्मिती प्रस्तावीत आहे. सदर प्रकल्पातील पाणी केवळ पिण्याच्या पाण्यासाठीच उपयोगी येईल म्हणून या क्षेत्रात बोअर ड्रिलींग करण्यास परवानगी, सिंचनाकरिता नसून केवळ पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्याच्या अटीवर सर्वेक्षण व तपास कार्य करण्यास मंडळाने शिफारस केली. |
| २.५ | **संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात तसेच त्याच्या आणि तुंगारेश्वर अभयारण्याच्या १० कि.मी. परिघात डेडीकेटेड फ्रेट कॉरिडॉर कॉर्पोरेशन यांनी प्रस्तावित केलेल्या रेल्वेमार्ग दुहेरीकरणास मान्यता देणे.** | डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर कॉर्पोरेशन इन्डिया लिमिटेड यांनी महाराष्ट्र राज्यातील जेएनपीटी ते दादरी (उत्तर प्रदेश) पर्यंत नवीन दुहेरी रेल्वे लाईन निर्माण करण्याचा उपक्रम हाती घेतलेला आहे. सदर रेल्वे लाईन महाराष्ट्र राज्यात रायगड व ठाणे जिल्हयातून प्रस्तावित आहे. संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातून अस्तित्वात असलेल्या रेल्वे लाईनला लागून सदर नवीन लाईन जाणार आहे. याकरिता संजय गांधी राष्ट्रीय उद्यान विभागाचे १०.८५५ हेक्टर वनक्षेत्र लागणार असून त्यापैकी ८.०५ हेक्टर वनक्षेत्र संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचे अधिसूचित क्षेत्र आहे. उर्वरीत २.८०५ हेक्टर संजय गांधी राष्ट्रीय उद्यान विभागाच्या ताब्यातील परंतु अधिसूचित नसलेले क्षेत्र आहे. प्रस्तावित वनक्षेत्र सन १९७५ पासून रेल्वे विभागाच्या ताब्यात असून त्यात रेल्वे लाईन अस्तित्वात आहे. परंतु सदर वनक्षेत्राचे निर्वनीकरण करण्यात आलेले नाही.<br>प्रस्तावित नवीन रेल्वे लाईन तुंगारेश्वर अभयारण्य व संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या | मा. अध्यक्षांनी सदस्यांना कळविले की, मुंबई शहर हे देशाचे दृष्टिने आर्थिक जिवनरेखा आहे. सदरचा प्रस्ताव राज्य व राष्ट्राच्या दृष्टिने देखील अतिशय महत्वाचा आहे. प्रकल्प यंत्रणेने नजीकचे रेल्वे स्थानक जवळच असल्यामुळे ३ मिटरपेक्षा जास्त खोलीची आखणी तांत्रिकदृष्टया शक्य नसल्याने भूमिगत मार्ग शक्य होणार नाही अशी अडचण वर्तविल्यामुळे व प्रकल्पाचे राष्ट्रीय स्वरुप तसेच त्याचे सार्वजनिक महत्व लक्षात घेता अंडरपासेस/ ओव्हरपासेस तयार करणे आणि रेल्वेलाईनच्या दोन्ही बाजुने जाळीचे कुंपन करण्याच्या अटीवर या प्रस्तावास मंडळाने शिफारस केली. |